यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

## 'राष्ट्रीय/राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन पथसंचलन, जिल्हास्तरीय पूर्व निवड चाचणी शिबीर'

दि. १८ ऑगस्ट २०१७

# सहभाग प्रमाणपत्र

श्री./कु. तेजल कैलास पानसरे.

महाविद्यालय श्री.शिव.छत्रपती कॉलेज, जुन्नर.

यांनी दि. १८ ऑगस्ट २०१७ रोजी मॉडर्न कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे याठिकाणी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना, व मॉडर्न कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय रासेयो विभाग, शिवाजीनगर, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ' राष्ट्रीय/राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन पथसंचलन, जिल्हास्तरीय पूर्व निवड चाचणी' या शिबीरात सहभाग घेतल्याबद्दल सदर प्रमाणपत्र प्रदान करण्यात येत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| डॉ. शिवाजी पाचारणे<br>जिल्हा समन्वयक<br>रासेयो, पुणे शहर | कार्यक्रम अधिकारी<br>राष्ट्रीय सेवा योजना<br>श्री शिवछत्रपती महाविद्यालय, जुन्नर (पुणे) | डॉ. राजेंद्र झुंजारराव<br>प्राचार्य<br>मॉडर्न महाविद्यालय, पुणे | डॉ. प्रभाकर देसाई<br>संचालक<br>रासेयो, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ |

Scanned by CamScanner

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना,

प्रोग्रेसीव्ह एज्युकेशन सोसायटीचे मॉडर्न कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, शिवाजीनगर

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

'राष्ट्रीय / राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन पथसंचलन, जिल्हास्तरीय पूर्व निवड चाचणी शिबीर'

दि. १८ ऑगस्ट २०१७

# सहभाग प्रमाणपत्र

श्री./कु. माधुरी काशिनाथ कुमकर. महाविद्यालय S.S.C. College. Junnar.

यांनी दि. १८ ऑगस्ट २०१७ रोजी मॉडर्न कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे याठिकाणी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना, व मॉडर्न कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय रासेयो विभाग, शिवाजीनगर, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ' राष्ट्रीय/राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन पथसंचलन, जिल्हास्तरीय पूर्व निवड चाचणी' या शिबीरात सहभाग घेतल्याबद्दल सदर प्रमाणपत्र प्रदान करण्यात येत आहे.

डॉ. शिवाजी पाचारणे<br>जिल्हा समन्वयक<br>रासेयो, पुणे शहर

कार्यक्रम अधिकारी<br>राष्ट्रीय सेवा योजना<br>श्री शिवछत्रपती महाविद्यालय, जुन्नर (पुणे)

डॉ. राजेंद्र झुंजारराव<br>प्राचार्य<br>मॉडर्न महाविद्यालय, पुणे

डॉ. प्रभाकर देसाई<br>संचालक<br>रासेयो, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Shri Shiv Chhatrapati College Junnar (Pune) IQAC

Scanned by CamScanner

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना,

प्रोग्रेसीव्ह एज्युकेशन सोसायटीचे मॉडर्न कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, शिवाजीनगर

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

'राष्ट्रीय/राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन पथसंचलन, जिल्हास्तरीय पूर्व निवड चाचणी शिबीर'

दि. १८ ऑगस्ट २०१७

# सहभाग प्रमाणपत्र

श्री./कु. टाके ओंकार शंकर

महाविद्यालय श्री शिव छत्रपती महा. जुन्नर

यांनी दि. १८ ऑगस्ट २०१७ रोजी मॉडर्न कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे याठिकाणी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना, व मॉडर्न कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय रासेयो विभाग, शिवाजीनगर, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ' राष्ट्रीय/राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन पथसंचलन, जिल्हास्तरीय पूर्व निवड चाचणी' या शिबीरात सहभाग घेतल्याबद्दल सदर प्रमाणपत्र प्रदान करण्यात येत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| डॉ. शिवाजी पाचारणे<br>जिल्हा समन्वयक<br>रासेयो, पुणे शहर | कार्यक्रम अधिकारी<br>राष्ट्रीय सेवा योजना<br>श्री शिवछत्रपती महाविद्यालय, जुन्नर (पुणे) | डॉ. राजेंद्र झुंजारराव<br>प्राचार्य<br>मॉडर्न महाविद्यालय, पुणे | डॉ. प्रभाकर देसाई<br>संचालक<br>रासेयो, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ |

Shri Shiv Chhatrapati College IQAC Junnar (Pune)

Scanned by CamScanner

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## राष्ट्रीय सेवा योजना

आयोजित

**'एन.आर.डी./एस.आर.डी. निवडपूर्व विद्यापीठस्तरीय चाचणी शिबीर'**

दि. ०१ सप्टेंबर २०१७

# प्रमाणपत्र

Dhake Omkar Shankar.

S.S.C. College Junnar, Pune.

यांनी दि. ०१ सप्टेंबर २०१७ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ याठिकाणी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आयोजित 'एन.आर.डी./एस.आर.डी. निवडपूर्व विद्यापीठस्तरीय चाचणी शिबीर' सहभाग घेतल्याबद्दल सदर प्रमाणपत्र प्रदान करण्यात येत आहे.

Shri Shiv Chhatrapati College Junnar (Pune) IQAC

राष्ट्रीय सेवा योजना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
श्री शिवछत्रपती महाविद्यालय, जुन्नर (पुणे)

प्रभाकर देसाई
संचालक, रासेयो
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,

Scanned by CamScanner

राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन पूर्व संचलन
राज्यस्तरीय निवड शिबीर,
बार्शी (महाराष्ट्र)

सत्यमेव जयते

NATIONAL PRE-REPUBLIC DAY PARADE
STATE LEVEL SELECTION CAMP,
BARSHI (MAHARASHTRA)

## प्रमाणपत्र

श्री/श्रीमती/कु. ढोके ओंकार शंकर
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
यास/हिस दि. ८ ते १० सप्टेंबर २०१७ या कालावधीत रासेयो क्षेत्रीय कार्यालय, पुणे, युवा कार्य व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई व राष्ट्रीय सेवा योजना विभाग, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर आणि श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन पूर्व संचलन राज्यस्तरीय निवड शिबिरात सक्रीय सहभाग घेतल्याबद्दल हे प्रमाणपत्र प्रदान करण्यात येत आहे.

## Certificate

This is to certify that
Mr./Mrs./Miss. Dhake omkar shankar
Savitribai phule pune university, pune
has actively participated in National Pre-Republic Day Parade State Level Selection Camp, Organized by the NSS Regional Directorate, Pune, Ministry of Youth Affairs and Sports, Government of India and Department of Higher & Technical Education, Govt. of Maharashtra, Mumbai, Solapur University, Solapur in Collaboration with NSS Unit, Shri Shivaji Mahavidyalaya, Barshi during 8th to 10th September 2017.

कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
श्री शिवछत्रपती महाविद्यालय, जुन्नर (पुणे)

| Mr. M. S. Dhokte | Dr. Prakash Thorat | Mr. K. V. Khadrinarsimhaiah | Dr. Atul Salunke | Dr. N. N. Maldar |
|---|---|---|---|---|
| Director NSS, Solapur University, Solapur | Principal Shri Shivaji Mahavidyalaya, Barshi | Regional Director, Govt. of India, Regional Directorate of NSS, Pune | State NSS Officer, NSS Cell, Gov. of Maharashtra | Vice Chancellor Solapur University, Solapur |

Shri Shiv Chhatrapati College IQAC Junnar (Pune)

Scanned by CamScanner

# प्रमाणपत्र

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे

मॉडर्न कला, विज्ञान, व वाणिज्य महाविद्यालय, पुणे – ५ व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळ पुरस्कृत

हिंदी व मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

पुणे जिल्हास्तरीय एकदिवसीय कार्यशाळा : दि. २२ फेब्रुवारी २०१८

Shri Shiv Chhatrapati College IQAC Junnar (Pune)

## 'माध्यमांमध्ये सूत्रसंचालन व व्हॉइस ओवरचा उपयोग /

## 'माध्यमों में सूत्रसंचालन और वॉइस ओवर का प्रयोग'

विद्यार्थी विकास मंडळ पुरस्कृत हिंदी व मराठी विभाग, मॉडर्न महाविद्यालय, पुणे–०५ द्वारा आयोजित एकदिवसीय कार्यशाळेमध्ये सहभागी झाल्याबद्दल ---शीतल नवले, एस. एस. सी. कॉलेज, जुन्नर--- यांना हे प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
श्री शिवछत्रपती महाविद्यालय, जुन्नर (पुणे)

डॉ. निशा भंडारे, संयोजिका, मराठी विभागप्रमुख

डॉ. प्रेरणा उबाळे, संयोजिका, हिंदी विभागप्रमुख

डॉ. शुभांगी पुराणिक (विद्यार्थी विकास अधिकारी)

डॉ. राजेंद्र झुंजारराव, प्राचार्य

Scanned by CamScanner

J.T.S.S.P.M.

**Shri Shiv Chhatrapati College, Junnar**

**Department of National Service Scheme (NSS)**

**Academic year 2017-18**

# REPORT OF VARIOUS ANNUAL ACTIVITIES AND NSS SPECIAL WINTER CAMP FOR THE ACADEMIC YEAR 2017-18

०८

जु.ता.शि.शि.प्र.मंडळ

श्री शिव छत्रपती महाविद्यालय,जुन्नर,पुणे

राष्ट्रीय सेवा योजना

**वार्षिक अहवाल २०१७-१८**

१. दि.१ ऑगस्ट २०१७ रोजी 'स्वच्छ व स्वस्थ भारत अभियान' अंतर्गत श्री डी.बी.खरात विस्तार अधिकारी पंचायत समिती ,जुन्नर यांनी स्वच्छतेची शपथ देऊन'राष्ट्रीय सेवा योजना' विभागातील स्वयंसेवकांना मार्गदर्शन करण्यात आले.

२.दि. २ ऑगस्ट २०१७ रोजी कु. अविनाश सुभाष सांगडे राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थी प्रतिनिधी व कु. भाग्यश्री ज्ञानेश्वर पठारे हिची विद्यार्थीनी प्रतिनिधी पदी निवड करण्यात आली.

३.दि. १२ ऑगस्ट २०१७ रोजी 'स्वच्छ व स्वस्थ भारत अभियान' अंतर्गत शिवनेरी किल्ला स्वच्छता मोहिम राबविण्यात आली.

४. दि१४ ऑगस्ट २०१७ रोजी जुन्नर शहरात स्वच्छता विषयक रॅली काढून जनजागृती केली.

५. दि.६ सप्टेंबर २०१७ रोजी जुन्नर नगरपरिषद व राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे पर्यावरणपूरक गणेश विसर्जन उपक्रमात निर्माल्य संकलित करण्यात आले.

६. दि.१७ सप्टेंबर २०१७ रोजी जुन्नर बस स्थानकाची स्वच्छता करण्यात आली.

७. दि.२४ सप्टेंबर २०१७ रोजी राष्ट्रीय सेवा योजना दिवस साजरा करण्यात आला. माजी प्राचार्य विजय देशमुख (अकोले) यांनी कार्यक्रमाचे उद्‌घाटन करण्यात आले.

८.दि. २४ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०१७ या कालावधीत राष्ट्रीय सेवा योजना सप्ताह साजरा करण्यात आला. यामध्ये स्वच्छ व स्वस्थ भारत ,अंधश्रध्दा निर्मूलन ,व्यक्तिमत्व विकास , स्त्री सबलीकरण इ. विषयावर व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले होते. व श्रमदान करण्यात आले.

९.दि. १९ नोव्हेंबर २०१७ रोजी जुन्नर तालुका विधी सेवा समिती व जुन्नर तालुका वकील वार असोसिएशनआयोजित विधी सेवा जनजागृती रॅलीत एन.एस.एस.स्वयंसेवकांचा सहभाग होता.

१०.दि. २६ नोव्हेंबर ते २ डिसेंबर २०१७ या कालावधीत मौजे बस्ती,ता.जुन्नर ,जि.पुणे या ठिकाणी विशेष श्रमदान शिबिर संपन्न झाले. या शिबिरात १५० स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. शिबिरामध्ये ग्रामस्वच्छता , वृक्षारोपण ,महिलासांठी हिमोग्लाबीन तपासणी शिबिर, जलसंवधनासाठी एक बंधारा इ.समाजपयोगी कामे केली. युवा सबलीकरण, बेटी बचाओ-बेटी पढाओ ,लोकरंजनातून लोकशिक्षण, व्यक्तीमत्व विकास इ. विषयावर व्याख्याने झाली.

कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
श्री शिवछत्रपती महाविद्यालय, जुन्नर

प्रभारी प्राचार्य
श्री शिवछत्रपती महाविद्यालय
जुन्नर (पुणे)

Scanned by CamScanner

११. दि.२६ नोव्हेंबर २०१७ रोजी संविधान दिन,मुंबई हल्ल्यातील शहीदांसाठी कॅन्डल मार्चमध्ये विद्यार्थ्यांसह गावकरी सहभागी झाले. स्त्री भ्रूणहत्या व्यसनमुक्ती, जलसंवर्धन, वनसंवर्धन, व्यक्तिमत्व विकास इ. विषयांवर गटचर्चेचे आयोजन,सांस्कृतिक गुणदर्शन, क्रिडा प्रकारांचे आयोजन करण्यात आले होते. मा.श्री किरणकुमार काकडे,तहसीलदार जुन्नर,प्रा.डॉ.श्रीकांत फुलसुंदर, पुणे ग्रामीण जिल्हा समन्वयक एन.एस.एस. यांनी शिबिरातील उपक्रमांचे कौतुक केले.

१२.दि.१७ डिसेंबर २०१७ सागरमाथा गिर्यारोहण संस्था, भोसरी,पुणे आयोजित शिवनेरी किल्ला, जुन्नर या ठिकाणी झालेल्या फोर्ट मॅरेथॉनमध्ये एन.एस.एस. मधील ४ विद्यार्थी व २ कार्यक्रम अधिकारी सहभागी झाले होते.

१३.दि. १२ जानेवारी २०१८ रोजी स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त युवा दिन व १२ ते १८ जानेवारी २०१८ युवा सप्ताहामध्ये महविद्यालयातील प्लॅस्टिक कचरा निर्मूलन मोहिम राबविण्यात आली.

१४.महाविद्यालयातील आरोग्य विभागाद्वारे रक्तदान शिबिरात एन.एस.एस. च्या स्वयंसेवकांनी रक्तदान केले.

१५.उत्कृष्ठ एन.एस.एस. एकक महाविद्यालय व उत्कृष्ठ कार्यक्रम अधिकारी पुरस्कार २०१७ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ हे पुरस्कार प्राप्त झाले.

१६.गडसंवर्धन,गड स्वच्छता मोहिमेत सहभाग-एन.एस.एस. विभागास व महाविद्यालयास महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त झाला.

१७.दि.२४ जानेवारी २०१८ रोजी राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त आयोजित रांगोळी स्पर्धेस मा. श्री किरणकुमार काकडे यांची सदिच्छा भेट.

१८.दि. २५ जानेवारी २०१८ रोजी एन.एस.एस. व महसूल विभाग,जुन्नर यांच्याद्वारे राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्यात आला. मा श्री किरणकुमार काकडे , तहसीलदार,जुन्नर तेजस्विनी सोलाट (इंडियाज सुपर मॉडेल विजेती २०१७) , सिध्देश जाधव (विराट कोहली हमशकल) इ. उपस्थित होते.

१९.दि.२५ जानेवारी २०१८ रोजी स्वच्छ भारत सर्वेक्षण २०१८ जुन्नर नगरपरिषदेचा स्वच्छ व उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार एन.एस.एस. विभाग व महाविद्यालयास प्राप्त झाला.

२०. दि. २८ जानेवारी २०१८ राष्ट्रीय पल्स पोलिओ कार्यक्रमासाठी एन.एस.एस. चे २५ विद्यार्थी ग्रामीण रुग्णालय, जुन्नर येथे सहभागी झाले.

२१. राज्यस्तरीय व राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन पूर्व संचलन (SRD/NRD) जिल्हास्तरीय पूर्व निवड चाचणी शिबिरामध्ये एन.एस.एस. च्या ५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
श्री शिवछत्रपती महाविद्यालय, जुन्नर

Shri Shiv Chhatrapati College IQAC Junnar (Pune)

प्रभारी प्राचार्य
श्री शिवछत्रपती महाविद्यालय
जुन्नर (पुणे)

Scanned by CamScanner

२२.राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन पूर्व संचलन राज्यस्तरीय निवड शिबिरामध्ये बार्शी, सोलापूर (महाराष्ट्र) या ठिकाणी कु.ढाके ओंकार शंकर यांनी सहभाग घेतला.

२३. तहसिलदार कार्यालय,जुन्नर आयोजित आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षणामध्ये दि.५.२.२०१८ रोजी २० स्वयंसेवकांसह कार्यक्रम अधिकारी प्रा.संतोष गवळी यांनी प्रशिक्षण घेतले.

२४.वार्षिक स्नेहसंमेलनामध्ये एन.एन.एस. विभागातील स्वयंसेवक कु.पूजा सोनवणे वैयक्तिक नृत्य प्रकारामध्ये प्रथम क्रमांक कु.संगिता डामसे वैयक्तिक गायन प्रकारामध्ये प्रथम क्रमांक व युगल गायन प्रकारामध्ये प्रथम क्रमांक मिळाला.

२५.वार्षिक स्नेहसंमेलनामध्ये स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत एन.एस.एस. विभागातील स्वयंसेवक कु. अक्षय निर्मळ महेश नायकोडी, प्रतिक दांडेकर , काजल रेंगडेश स्वयं शुभम ताजणे, अक्षदा नांगरे यांनी स्वच्छता जनजागृती नृत्य सादर केले. त्यास जुन्नर नगरपरिषदेने सन्मान चिन्ह देऊन गौरव केला.

२६.दि.१३ फेब्रुवारी ते १८ फेब्रुवारी २०१८ या कालावधीत किनवट,जि.नांदेड (महाराष्ट्र) या ठिकाणी नॅशनल युथ प्रोजेक्ट, नवी दिल्ली आणि भारत जोडो युवा अकादमी मार्फत राष्ट्रीय एकात्मता युवा शिबिरात कु.अक्षय निर्मळ सहभागी झाला.

२७.दि.१४ फेब्रुवारी ते १७ फेब्रुवारी २०१८ या कालावधीत डॉ. डी.वाय.पाटील कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय आयोजित विद्यापीठ स्तरीय शिबिरात रतनवाडी ता.अकोले,जि.अहमदनगर येथे २ स्वयंसेवक सहभागी झाले.

२८.दि.१४ फेब्रुवारी ते १५ फेब्रुवारी २०१८ ॲड. एम.एन.देशमुख कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,ता.अकोले,जि.अहमदनगर आयोजित विद्यापीठ स्तरीय शिबिरात हरिश्चंद्र गड येथे २ स्वयंसेवक सहभागी झाले.

कार्यक्रम अधिकारी
(रा.से.यो.)
प्रा.संतोष गवळी
प्रा.राहूल सहाने
प्रा.आबाजी सूर्यवंशी

प्राचार्य

Shri Shiv Chhatrapati College IQAC Junnar (Pune)

कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
श्री शिवछत्रपती महाविद्यालय, जुन्नर

प्रभारी प्राचार्य
श्री शिवछत्रपती महाविद्यालय
जुन्नर (पुणे)

Scanned by CamScanner

जु.ता.शि.शि.प्र.मंडळ

श्री शिव छत्रपती महाविद्यालय,जुन्नर,पुणे

राष्ट्रीय सेवा योजना

विशेष श्रमसंस्कार शिबिर (बस्ती)

कार्यक्रम अहवाल २०१७-१८

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व श्री शिव छत्रपती महाविद्यालय ,जुन्नर यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर दि. २६ नोव्हेंबर २०१७ ते २ डिसेंबर २०१७ या काळात मोजे.बस्ती.ता.जुन्नर जि.पुणे येथेआयोजित करण्यातआले होते.

या शिबिराचा उद्‌घाटन समारंभ दि.२६ नोव्हेंबर २०१७ रोजी संपन्न झाला. या उद्‌घाटन प्रसंगी जु.ता.शि.शि.प्र.मंडळाच्या खजिनदार मा. सौ.कांताताई मस्करे उद्‌घाटक म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी त्यांच्या मनोगतातून वेगवेगळे समाज उपयोगी उपक्रम राबविताना ग्रामविकासामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवकांचे योगदान महत्त्वाचे आहे ,असे मत व्यक्त केले. तसेच मा.प्राचार्य डॉ. सी.आर.मंडलिक, अध्यक्ष प्रतिनिधी मा.प्रा.व्ही.बी.कुलकर्णी , महाविद्यालयाचे इतर प्राध्यापक वृंद,बस्ती गावचे सरपंच ,उपसरपंच ,जि. प.सदस्य गुलाब पारखे व इतर ग्रामस्थ उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संयोजन मा.प्राचार्य डॉ.सी.आर.मंडलिक ,राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रा.गवळी एस.बी.,प्रा. सहाणे आर.बी.,प्रा.सूर्यवंशी ए.व्ही., विद्यार्थी प्रतिनिधी कु.अविश्नाश सांगडे ,कु.भाग्यश्री पठारे, शिक्षकेतर कर्मचारी शेळकंदे मामा व मस्करे मामा इ.नी केले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रा. गवळी एस.बी.,प्रा. सहाणे आर.बी. यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.सूर्यवंशी ए.व्ही. यांनी केले. दि.२६ नोव्हेंबर २०१७ रोजी सकाळी ११.०० वा. उद्‌घाटनापूर्वी ग्रामस्वच्छता अभियानाने शिबिराची सुरुवात झाला. यामध्ये विद्यार्थ्यांनी रस्ते सफाई करुन गावाचा परिसर स्वच्छ केला. उद्‌घाटन समारंभाचे सर्वांनी ग्रामस्थांसह संविधान दिनाची शपथ घेतली. व त्यानंतर विद्यार्थ्यांना रात्रीचे भोजन देण्यात आले व नंतर २६ नाव्हेंबर रोजी झालेल्या मुंबई वरील हल्यामध्ये शहिद झालेल्या जवानांसाठी श्रध्दांजली म्हणून कँडल मार्च रॅली गावातून काढण्यात आली.

दि. २७.११.२०१७ रोजी शिबिराचा दुसरा दिवस सकाळी ६ वा. व्यायाम,७ वा.प्रार्थना,७.३० वा. नाष्टा,सकाळी ८ वा. ते १२ वा.श्रमदान तसेच १ वा. वैयक्तिक स्वच्छता व १ ते २ वा.पर्यंत व्याख्यान ,५ वा चहा,५.३० ते ७ वा.गटचर्चा, ७ ते ८ वा. विविध गुणदर्शन तयारी , ८ ते ९ वा. भोजन, ९ ते १० वा.विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम घेण्यात आले. अगोदरच्या दिवशी उद्‌घान सोहळा पार पडल्यामुळे आजच्या दुसऱ्या दिवसामध्ये प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये जोश आणि उत्साह होता.

| | |
|---|---|
| कार्यक्रम अधिकारी | प्रभारी प्राचार्य |
| राष्ट्रीय सेवा योजना | श्री शिवछत्रपती महाविद्यालय |

Scanned by CamScanner

पहाटे सकाळी ५ वा.दिवसाची सुरुवात झाली. पहाटे ६ वा. सर्वांना २ किमी. धावण्यास सांगितले त्यानंतर कार्यक्रम अधिकाऱ्यांनी व्यायाम घेतले. व व्यायामाचे महत्त्व सांगितले. दररोज व्यायाम केल्याने शारीरीक व मानसिक स्वास्थ्य उत्तम प्रकारे कसे राहते या विषयावर थोडक्यात प्रा. गवळी सर यांनी विद्यार्थ्यांना महत्त्व पटवून दिले. त्यामध्ये ते म्हणाले व्यायामाने शरीर सुदृढ बनते. त्यानंतर राष्ट्रीय सेवा योजनेचे गायन झाल्यानंतर सर्वांना नाष्टा देण्यात आला. सर्व विद्यार्थ्यांनी गावातील स्मशानभूमी येथे स्वच्छता करण्यात आली. तसेच अंगणवाडी येथील भागाची स्वच्छता झाल्यानंतर दुपारचे जेवण झाले. मौजे बस्ती सावरगाव येथे असणारे दत्तमंदिर या ठिकाणी डॉ. प्रितमकुमार बेदरकर सर यांनी **'युवा सबलीकरण'** या विषयावर व्याख्यान दिले. त्यांच्या व्याख्यानातून आजच्या जिवनामध्ये युवा पिढी ही कशी भरकटत चालली आहे म्हणूनच त्यांना मार्गदर्शनाची कशाप्रकारे गरज आहे असे त्यांनी त्यांच्या व्याख्यानातून आपले विचार व्यक्त केले. त्यांनी युवा पिढीला कशाप्रकारे सक्षम करण्याची गरज आहे हे सांगितले. डॉ. प्रितम बेदरकर सरांनी सर्व एन.एस.एस. च्या स्वयंसेवकांना अतिशय चांगल्याप्रकारे मार्गदर्शन केले. तसेच बेदरकर सरांनी सर्व स्वयंसेवकांनी आपल्या करीयर विषय तसेच युवा पिढी आपल्या समोर कोणाचे आदर्श ठेवावे, असे वेगवेगळे प्रश्न त्यांना विचारण्यात आले. सरांनी सर्व विचारलेल्या प्रश्नांची अतिशय अचूक आणि समाधानकारक उत्तरे दिली. व त्यांनी त्यांचे थोडक्यात विश्लेषण करुन सांगितले. सर्व स्वयंसेवकांनी आपल्या मनात असलेल्या शंकांचे निरसन करण्यात आले. कार्यक्रम संपल्यानंतर सर्व विद्यार्थी प्राथमिक शाळेत भोजन करण्यासाठी आले. भोजन झाल्यानंतर सर्वांच्या मनोरंजनासाठी आणि विद्यार्थ्यांची करमणूक व्हावी यासाठी प्रा. सूर्यवंशी सरांनी जर-तर हा खेळ घेतला व यानंतर दिवसाचा समारोप झाला.

दि.२८.११.२०१७ विशेष श्रमसंस्कार शिबिराचा तिसरा दिवस. या दिवशी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या स्वयंसेवकांनी सकाळी ५.४५ वा. दिवसाची सुरुवात झाली. सकाळी ठिक ६.०० वा. प्राथमिक शाळेच्या मैदानावर उपस्थित झाले. तर नंतर सर्व विद्यार्थी धावण्याचा व्यायाम करण्यास गेले. तेथून आल्यानंतर प्राथमिक शाळेच्या मैदानावर व्यायाम केला. व्यायामानंतर प्रार्थना घेण्यात आल्या नंतर विद्यार्थ्यांना अल्पोपहार देण्यात आला. त्यांनतर सर्व स्वयंसेवक विद्यार्थी श्रमदान करण्यासाठी नेमून दिलेल्या गटानूसार रांगेत उभे राहिले. नंतर श्रमदानासाठी बस्ती सावरगावातील स्मशानभूमी, प्राथमिक शाळा, दत्त मंदिर परिसर, समाज मंदिर परिसर, पाटील वाडयाच्या आजूबाजूचा परिसर स्वच्छ करुन घेतला. ही सर्व साफसफाई करताना विद्यार्थ्यांनी ५ ते १० मिनिटांचा विश्राम घेतला. त्यानंतर ठिक १२.०० वा.विद्यार्थ्यांना स्नान करण्यासाठी सोडण्यात आले. यासाठी विद्यार्थ्यांना प्राथमिक शाळेच्या मैदानावर जमा होण्यास सांगितले.त्यानंतर विद्यार्थ्यांनी जेवण करुन १ तास वेळ देण्यात आला. २ ते ३ गटचर्चेसाठी विषय देण्यात आले. त्यानंतर ३ वा. **'बेटी बचाओ, बेटी पढाओ'** या विषयावर प्राचार्य पंडित शेळके सर यांचे व्याख्यान ठेवण्यात आले.

Scanned by CamScanner

त्यांच्या समवेत त्यांच्या ज्युनियर कॉलेजचे प्रा. तांबडे सर उपस्थित होते. शेळके सरांनी विद्यार्थ्यांना अतिशय मोलाचे मार्गदर्शन केले.

त्यांनी प्रथम राष्ट्रीय सेवा योजनेच्या उत्कृष्ट स्वयंसेवक कसा असावा, त्याच्यात कशा प्रकारचे गुण असावेत, त्याचे वागणे, बोलणे इतरांपेक्षा कसे असावे, याचे मोलाचे मार्गदर्शन केले. त्यानंतर त्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांध्ये स्त्रीयांविषयीच्या चांगली भावना निर्माण व्हावी म्हणून त्यांच्या जिवनाबद्दल सांगितले. त्यांची मानसिकता कशी असते. त्यांना समाज कशाप्रकारे प्रतिसाद देतो. त्यानंतर त्यांना कशाप्रकारे वागणूक द्यावी याबद्दल प्रबोधन केले. आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या सर्व स्वयंसेवकांना सांगितले की **'बेटी बचाओ बेटी पढाओ'** या संकल्पनेची सुरुवात स्वतःपासून करावी आणि सर्व स्वयंसेवकांनी त्यांना आश्वासन दिले हा कार्यक्रम दोन ते अडीच तास चालला. कार्यक्रम झाल्यानंतर सर्व विद्यार्थ्यांनी स्वतःचा परिचय करुन दिला. या परिचयामुळे विद्यार्थ्यांची व्यासपीठाची भिती कमी झाली. आणि विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास थोडयाफार प्रमाणात वाढला. त्यानंतर ८.०० वा प्राथमिक शाळेच्या मैदानावर जेवणासाठी जमा झाले. जेवणानंतर विद्यार्थी पुन्हा ग्रामपंचायतीच्या कार्यालयासमोर जमा झाले. या सर्व गटांनी सहभाग घेतला होता. विद्यार्थ्यांनी उत्कृष्टरीत्या मूकनाट्य सादर केले. यामधून विद्यार्थ्यांमधील विविध गुण दिसून आले.त्यानंतर सर्व स्वयंसेवक विश्राम गृहाकडे पाठविण्यात आले.

स्त्री रडली तर डोळ्यातून
फक्त काजळ वाहते
अश्रू एकच पण किंमत वेगळी ठरते
पण जगात स्त्रीला काहीच किंमत नसते

दि.२९.११.२०१७ राष्ट्रीय सेवा योजना श्रम संस्काराचा चौथा दिवस या दिवसाची सुरुवात पहाटे ५.४५ वा. झाली. सर्व विद्यार्थी मॉर्निंग वॉक साठी गेले. त्यानंतर व्यायाम करुन सर्वांनी प्रार्थना केली. व नंतर नाष्टा करण्यात आला. त्या दिवशी आम्ही सर्व विद्यार्थ्यांना घेऊन मंदिर परिसर, प्राथमिक शाळा परिसर , रस्त्यांची दोन्ही बाजूंची स्वच्छता करण्यात आली. त्यानंतर बस्ती गावातील अनेक महत्वाच्या ठिकाणाचे रस्ते स्वच्छ केले.

चालण्यासाठी वाट असते
वाटेसाठी चालणे नसते
उंच भरारी घेण्यासाठी
आभाळाचे भान नसते

कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना

प्रभारी प्राचार्य
श्री शिवछत्रपती महाविद्यालय

Scanned by CamScanner

असे नेहमीच्या जीवनात पाऊल पडणारे रस्ते तयार झाले. परंतु विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनामध्ये यश संपादन करायचे असेल तर लोक रंजनातून लोकशिक्षण होणे गरजेचे आहे असे व्याख्यान प्रा. विजय देशमुख यांनी दिले. त्यांनी त्यांच्या व्याख्यानातून आम्हाला अनेक मनोरंजनात्मक गाणी म्हणून दाखवली तसेच त्या माध्यमातून विद्यार्थ्यांना खूप प्रेरणा भेटली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष देशमुख सरांचे शिष्य व कॉलेजचे प्राचार्य प्रा.डॉ. सी.आर.मंडलिक सर होते. देशमुख सरांनी **'माणूस जोडा आणि वाईट विचार सोडा'** असा संदेश विद्यार्थ्यांना दिला. त्यानंतर चहापान झाला व नंतर लोकरंजनातून लोकशिक्षण यावर गटचर्चा घेण्यात आली, नंतर जेवण झाल्यावर रात्री विविध प्रकारचे पथनाटय सादर करण्यात आले.या पथनाटयातून विविध प्रकारचे संदेश दिले गेले. त्यात शेतकऱ्यांची आत्महत्या , स्त्रियांवरील अत्याचार इ. अनेक प्रकारचे मूकनाटय सादर करण्यात आले.

दि. ३०.११.२०१७ श्रम संस्काराचा पाचवा दिवस. या दिवसाची सुरुवात पहाटे सकाळी ५.४५ वा. झाली. सकाळी ६.०० वा. व्यायामाने सुरुवात झाली. त्यानंतर सकाळी ८.०० वा. सर्वांना नाष्टा देण्यात आला. नाष्टा झाल्यावर सर्वांना ग्रुपनूसार रांगेत बसविण्यात आले. व मुलींचे दोन वेगवेगळे गट तयार केले व मुलांचा एक गट करण्यात आला. मुलींचा एक गट गावात सर्वेक्षणासाठी गेला व हिमाग्लोबीन चेकअपसाठी शिबिर घेतले यामध्ये सुमारे ४० महिलांनी सहभाग घेतला. आणि दुसरा गट बस्ती सावरगावात प्राथमिक आरोग्य केंद्र या ठिकाणी दवाखान्याची स्वच्छता व आसपासची स्वच्छता करण्यासाठी गेला. व विद्यार्थी बंधारा बांधण्यासाठी गेले. विद्यार्थ्यांनी ५०० गोनींचा मोठा बंधारा बांधला. नंतर १२ ते १ वाजेपर्यंत आंघोळीसाठी वेळ देण्यात आला. आम्हाला गटचर्चेसाठी आजच्या तरुण पिढीची मनोवृत्ती हा विषय दिला. व त्यावर गटचर्चा झाली. त्या गटचर्चेने एक वेगळाच चांगला असा रंग घेतला होता.

आजच्या कार्यक्रमाला सुरुवात झाली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे हे नारायणगावचे प्रा.डॉ. श्रीकांत फुलसुंदर सर , पुणे जिल्हा (ग्रामीण) रा.से.यो. समन्वयक सा.फु.पुणे विद्यापीठ होते. तसेच त्यांच्या सोबत कांबळे सर, वामन सर होते. त्या कार्यक्रमाचे अध्यक्ष सहाणे सर होते. मा.डॉ. फुलसुंदर सर हे यांना २०१२ चा उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी हा पुरस्कार देण्यात आला. त्यांनी व्यक्तिमत्व विकास या विषयावर अतिशय मार्मिकपणे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तरुणांमध्ये तेजस्विता , तत्परता, तपस्विता हे गुण असावेत. त्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणिव कशी निर्माण होते. या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांमध्ये नेमके कोणत्या प्रकारचे गुण असावेत, या विषयी त्यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. नंतर कार्यक्रम संपल्यानंतर रा.से.यो.चे माजी कार्यक्रम अधिकारी प्रा.दुशिंग सर , प्रा.शेख सर , प्रा.कोरडे सर यांनी मोलाचे मार्गदर्शन करण्यासाठी व आम्हाला भेट देण्यास आले होते. त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांचे जेवण झाले व त्यानंतर मनोरंजनात्मक कार्यक्रम घेण्यात आला.

कार्यक्रम अधिकारी

प्रभारी प्राचार्य

Shri Shiv Chhatrapati College IQAC Junnar (Pune)

Scanned by CamScanner

Shri Shiv Chhatrapati College IQAC Junnar (Pune)

१.१२.२०१७ राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचा हा सहावा दिवस. सकाळी ५.४५ वा. दिवसाची सुरुवात झाली. सकाळी ६.०० वा सर्व विद्यार्थी धावण्यास गेले. व नंतर व्यायाम झाला. त्यानंतर प्रार्थना व राष्ट्रीय सेवा योजना गीत गायन झाले. सकाळी ८.०० वा. सर्वांनी नाष्टा केला आणि कामासाठी निघाले. कामासाठी लागणारे सर्व साहित्य विद्यार्थ्यांनी घेतले आणि सर्व विद्यार्थी काम करण्यासाठी गेले, सर्व विद्यार्थी वृक्षारोपण कार्यक्रम एकदम गुंग झाले होते. किती अंतरावर कोणते झाड लावायचे आहे. खड्डा कसा खणावा,आळे कसे करावे हया सर्व गोष्टी बस्ती गावचे सरपंच ,उपसरपंच सांगत होते. वृक्षलागवडीचे उद्घाटन गावचे सरपंच,उपसरपंच, कार्यक्रम अधिकारी प्रा.गवळी एस.बी., प्रा.सहाणे आर.बी., प्रा.सूर्यवंशी ए.व्ही.,विद्यार्थी प्रतिनिधी अविनाश सांगडे ,भाग्यश्री पठारे यांच्या हस्ते करण्यात आले.'वृक्षवल्ली आम्हा सोयरे' या उक्तीप्रमाणे पाम जातीची १०० झाडांची लागवड बस्ती या गावात करण्यात आली. नंतर सर्व विद्यार्थी अंघोळीसाठी गेले व नंतर सर्वांचे भोजन झाले. त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांसाठी मैदानी खेळांचे आयोजन केले होते. त्यामध्ये कबड्डी ,क्रिकेट,संगीत खुर्ची,रस्सी खेच हे खेळ घेण्यात आले. या खेळांमुळे विद्यार्थ्यांमधील विविध गुण दिसून आले. सर्व विद्यार्थ्यांनी या खेळाचा मनमुराद आनंद घेतला. या नंतर चहा झाला. चहा झाल्यानंतर सर्व विद्यार्थ्यांनी मनोरंजन कार्यक्रमाला सुरुवात केली. तसेच या सर्व शिबिरातील आपले अनुभव सांगण्यास विद्यार्थ्यांनी सुरुवात केली. सर्व विद्यार्थी खूप भावूक झाले होते. तर काही विद्यार्थी तर रडत होते. नंतर जेवण झाले. त्यामध्ये मासवडी स्पेशल होती. सर्वांनी त्याचा मनमुराद आनंद घेतला व नंतर पुन्हा मनोरंजन कार्यक्रमास सुरुवात झाली. प्रत्येक विद्यार्थी बोलण्यास उत्सुक होते यानंतर प्रा.गवळी एस.बी. यांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले व सर्व विद्यार्थी झोपण्यास गेले.

दि.२.१२.२०१७ हा शिबिराचा सातवा दिवस व शेवटचा दिवस. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व श्री शिव छत्रपती महाविद्यालय ,जुन्नर यांच्या सयुंक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिराचा आज शेवटचा दिवस, या दिवशी नेहमीप्रमाणे विद्यार्थ्यांच्या दिवसाची सुरुवात सकाळी ६.०० वा.झाली. व्यायामानंतर प्रार्थना व नाष्टा झाल्यावर सर्व विद्यार्थ्यांनी राहिलेल्या ठिकाणचा परिसर स्वच्छ केला. व सर्वांनी आपल्या सामानाची आवराआवर केली. व नंतर सर्व विद्यार्थी, विद्यार्थिनी ,स्वयंसेवक यांनी समारोपाचा कार्यक्रम आयोजित केला. दुपारी १२.०० वा. कार्यक्रमास सुरुवात झाली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे संस्थेचे जु.ता.शि.शि.प्र.मंडळाचे सहसचिव मा.सुभाष कवडे उपस्थित होते. त्याचप्रमाणे विश्वस्त मा. अनिलकाका जोगळेकर, पालक प्रतिनिधी मा. अशोक काळे, अध्यक्ष प्रतिनिधी प्रा. व्ही.बी.कुलकर्णी ,मा. प्राचार्य डॉ. सी.आर.मंडलिक , उपप्राचार्य एस.जी.कुलकर्णी, ज्युनिअर महाविद्यालय उपप्राचार्य प्रा. सूर्यवंशी एस.डी. ,प्रा.गोरडे सर,प्राखत्री सर, प्रा.तांबे सर, बस्ती गावच्या सरपंच मा.सौ. मायाताई रोकडे,उपसरपंच रोहिदास

कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना

प्रभारी प्राचार्य
श्री शिवछत्रपती ...

Scanned by CamScanner

Shri Shiv Chhatrapati College IQAC

गोरडे, अतुल परदेशी ,कार्यक्रम आधिकारी प्रा. गवळी, प्रा.सहाणे, प्रा.सूर्यवंशी, विद्यार्थी प्रतिनिधी कु. अविनाश सांगडे,कु. भाग्यश्री पठारे व इतर ग्रामस्थ व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते. या शिबिरा दरम्यान सर्व विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले ते पुढील कवितेतून व्यक्त होते.

मेल्यावरती सर्व नको आम्हास
जिवंतपणी यश पाहिजेल
माणसाची साथ पाहिजे
गर्दी नको माणसांची
जिवंतपणी फक्त एन.एस.एस.ची
साथ पाहिजे

तसेच पालक प्रतिनिधी मा. अशोक काळे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. त्यांनी त्यांच्या मनोगतातून असे सांगितले की राष्ट्रीय सेवा योजना असा विभाग आहे की, तो कुठेही कोणत्याही क्षणी मागे रहात नाही. कोणत्याही कारणास्तव २४ तास तत्पर असतो. एन.एस.एस.मुळे आतापर्यंत अनेक मोठया व्यक्ती घडल्या आहेत. एन.एस.एस. मुळे विद्यार्थ्यांमध्ये परिवर्तन घडते. त्यानंतर गावचे सरपंच ,उपसरपंच , प्राचार्य डॉ. सी.आर.मंडलिक , सहसचिव मा.सुभाष कवडे या सर्वांनी आपले मनोगत व्यक्त करुन कार्यक्रमाची शोभा वाढवली. व अशा प्रकारे सर्व मान्यवरांच्या सहकार्याने कार्यक्रम संपन्न झाला. सर्व स्वयंसेवकांच्या तोंडून उमटत होते. की,

एन.एस.एस. तुच आहेस श्वास आमुचा
एन.एस.एस. तुच आहेस ध्यास आमुचा !!
एन.एस.एस. मुळेच घडतो आम्ही
एन.एस.एस.साठीच लढतो आम्ही !!
एन.एस.एस.तुच आहेस आमच्या विद्यार्थ्यांचा दाता

एन.एस.एस.तुच आहेस या विश्वाचा विश्वकर्ता

कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
श्री शिवछत्रपती महाविद्यालय, जुन्नर

प्रभारी प्राचार्य
श्री शिवछत्रपती महाविद्यालय
जुन्नर (पुणे)

Scanned by CamScanner